लोकसत्ता ५.मा.१.

# महामार्गावरील वाहनचालकांना शिस्त लावण्यासाठी स्वयंचलित यंत्रणा

## वाहतूक विभाग प्रस्ताव तयार करणार

**लोकसत्ता वार्ताहर**

**वसई:** अपघाताचे प्रमाण रोखण्यासाठी वसई-विरार व मीरा-भाईंदर पोलीस आयुक्तालयांच्या हद्दीतून जाणाऱ्या मुंबई-अहमदाबाद राष्ट्रीय महामार्गावर ऑटोमॅटिक पेनल्टी सिस्टम कॅमेरे बसविण्याची मागणी जोर धरू लागली आहे. तसा प्रस्ताव वाहतूक विभागाकडून तयार करून सार्वजनिक बांधकाम व महामार्ग प्राधिकरण यांच्याकडे दिला जाणार आहे.

मध्यंतरी ज्या भागात जास्त प्रमाणात अपघात घडले आहेत अशा ठिकाणांची पाहणी करण्यात आली होती. व त्यानुसार त्या भागांना अपघात प्रवण क्षेत्र घोषित करण्यात आले होते. यात किनारा ढाबा, दुर्गा माता मंदिर, वासा खाडी पूल, लोढाधाम परिसर, सातिवली खिंड, बर्माशेल पेट्रोल पंप, गोल्डन चॅरिओट हॉटेल, विरार फाटा, वाघोबा खिंड, घोडबंदर ठाणे मार्ग यासह इतर अशा १६ अपघात प्रवण क्षेत्रांचा यात समावेश आहे. वाहनचालक हे नियमबाह्य पद्धतीने वाहने चालवीत असल्याने अपघाताच्या घटना घडतात. घटनांमध्ये अनेकांना जीव गमवावा लागला आहे तर काही जण जखमी झाले आहेत.

नुकत्याच पार पडलेल्या बैठकीत ऑटोमॅटिक पेनल्टी सिस्टम कॅमेरे बसविण्याची मागणी करण्यात आली आहे.

### वेगावर नियंत्रण

ऑटोमॅटिक पेनल्टी सिस्टमचे कॅमेरे बसविल्यास जे वेगाने वाहने चालवितात त्यांना आवर घालता येणार आहे. याशिवाय तात्काळ गुन्हे दाखल करता येतील. यामुळे घडणारे अपघात कमी होतील. अशा प्रकारे कॅमेरे मुंबई-पुणे, मुंबई नाशिक महामार्ग व औरंगाबाद येथे बसवलेले आहेत.

---

लोकसत्ता ५.मा.३,

# नायगाव पोलीस ठाण्याचे शुक्रवारी उद्घाटन

## शहरातील ११ वे पोलीस ठाणे

**लोकसत्ता विशेष प्रतिनिधी**

**वसई :** बहुचर्चित नायगाव पोलीस ठाण्याचे काम पूर्ण झाले असून, शुक्रवार १७ मार्च रोजी त्याचे उद्घाटन होणार आहे. नायगाव हे वसई-विरार शहरातील ११ वे आणि मीरा-भाईंदर पोलीस आयुक्तालयातील १७ वे पोलीस ठाणे आहे.

मीरा-भाईंदर वसई-विरार पोलीस आयुक्तालयाची स्थापना १ ऑक्टोबर २०२० रोजी झाली. पालघर आणि ठाणे ग्रामीण पोलीस अधीक्षक कार्यालयाचे विभाजन करून हे नवीन पोलीस ठाणे तयार करण्यात आले होते.

नव्या रचनेत शहरात तीन परिमंडळे तयार करण्यात आली आहेत. त्यापैकी मीरा-भाईंदर शहर परिमंडळ १ मध्ये, तर वसई-विरार शहरात २ परिमंडळे तयार केली आहेत. त्या वेळी वसई-विरार शहरात मांडवी, पेल्हार, बोळिंज, आचोळे आणि नायगाव पोलीस ठाणे प्रस्तावित करण्यात आली होती. २०२१ मध्ये पेल्हार पोलीस ठाणे, तर २०२२ मध्ये मांडवी आणि आचोळे पोलीस ठाणे तयार करण्यात आले. बोळिंज आणि नायगाव पोलीस ठाण्याचे निर्मिती करण्यात येणार होती. जागेअभावी बोळिंज पोलीस ठाण्याचे काम रखडले होते. तर, नायगावमध्ये भाड्याच्या जागेत पोलीस ठाणे सुरू करण्यात आले. वालीव आणि माणिकपूर पोलीस ठाण्याचे विभाजन करून नायगाव पोलीस ठाणे तयार करण्यात आले आहे.

नायगाव पोलीस ठाण्याच्या प्रभारीपदी वरिष्ठ पोलीस निरीक्षक रमेश भामे यांची नियुक्ती करण्यात आली आहे. शुक्रवारी सकाळी ११ वाजता राज्याचे पोलीस महासंचालक रजनीश सेठ यांच्या हस्ते या पोलीस ठाण्याचे उद्घाटन केले जाणार आहे.

Scanned with CamScanner

पुढारी पा. नं. ३०

# मेट्रो कारशेड विरोधक अहवालाच्या प्रतीक्षेत

## मुख्यमंत्र्यांच्या आदेशानंतरही एमएमआरडीएकडून कार्यवाही नाही

**भाईंदर : राजू काळे**

राज्य शासन एमएमआरडीएच्या माध्यमातून मेट्रो प्रकल्प राबवित असून त्यापैकी मेट्रो प्रकल्प ९ अंतर्गत दहिसर चेकनाका ते भाईंदर दरम्यान मेट्रो मार्गाचे काम सुरु आहे. यासह मेट्रो प्रकल्प ७ चे कारशेड भाईंदर येथील मुर्धा, राई व मोर्वा गावातील सुमारे ३५ हेक्टर जागेत प्रस्तावित करण्यात आली आहे. त्याला ग्रामस्थांनी तीव्र विरोध दर्शवित कारशेड उत्तन येथील शासकीय जागेत स्थलांतर करण्याची मागणी केली आहे. याबाबत ग्रामस्थांचे शिष्टमंडळ आ. प्रताप सरनाईक यांच्या माध्यमातून मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांना नागपूर येथील गेल्या हिवाळी अधिवेशनात भेटले असता मुख्यमंत्र्यांनी उत्तनमधील त्या जागेचा कारशेडसाठी व्यवहार्यता अहवाल सादर करण्याचे निर्देश एमएमआरडीएला दिले. मात्र एमएमआरडीएकडून त्यावर कोणतीही कार्यवाही न झाल्याचा आरोप ग्रामस्थांनी केला असून ते या अहवालाच्या प्रतिक्षेत असल्याचे त्यांनी सांगितले.

कारशेड नेताजी सुभाषचंद्र बोस मैदानामागून तेथील मिठागराच्या जागेत प्रस्तावित करण्यात आली होती. त्याला केंद्रीय मीठ विभागाकडून परवानगी मिळण्याची शक्यता नसल्याने गृहीत धरून तेथील कारशेड मुर्धा, राई व मोर्वा गावातील सुमारे ३५ हेक्टर जागेत प्रस्तावित करण्यात आली. या कारशेडच्या प्रकल्पात गावातील शेतजमिनीसह ग्रामस्थांची घरे आदी सुमारे ४०० हून अधिक बांधकामे बाधित होत असल्याने ग्रामस्थांनी या कारशेडला तीव्र विरोध दर्शविला आहे. त्यांनी हो कारशेड उत्तन परिसरातील शासकीय जागेत प्रस्तावित करण्याची मागणी लावून धरली आहे. दरम्यान शासनाने काढलेल्या संबंधित गावांमधील जमीन अधिग्रहणाच्या अधिसूचनेवर ग्रामस्थांनी सुमारे १ हजारांहून अधिक हरकती घेतल्या. त्यावर गेल्याच महिन्यात कोकण विभागीय आयुक्तालयात सुनावण्या घेण्यात आल्या. त्याप्रमाणे पालिकेच्या प्रारुप शहर विकास आराखड्यात याच गावांतील जमिनीवर कारशेडचे आरक्षण टाकण्यात आल्याने त्यावर देखील ग्रामस्थांनी आक्षेप घेत हरकती दाखल केल्या. त्यावरील सुनावण्या देखील गेल्याच महिन्यात पार पडल्या. यानंतर ग्रामस्थांनी आ. सरनाईक यांच्या माध्यमातून गावातील जागेत प्रस्तावित करण्यात आलेली कारशेड उत्तनमधील शासकीय जागेत प्रस्तावित करण्याची राज्य सरकारकडे मागणी करीत मेट्रो प्रकल्प ९ चा विस्तार उत्तनपर्यंत केल्यास तेथील शासकीय जागेत कारशेड बांधल्यास ती सोईस्कर ठरणार असल्याचा दावा ग्रामस्थांनी केला. याप्रमाणे नागपूर येथे पार पडलेल्या गेल्या हिवाळी अधिवेशनात ग्रामस्थांच्या शिष्टमंडळाने सरनाईक यांच्या माध्यमातून मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांची भेट घेतली. त्यावेळी पार पडलेल्या चर्चेत देखील ग्रामस्थांनी उत्तन मधील शासकीय जागेतच कारशेड प्रस्तावित करण्याची मागणी केली. ती मान्य करीत मुख्यमंत्र्यांनी उत्तन मधील शासकीय जागेतील प्रस्तावित कारशेडचा व्यवहार्यता अहवाल सादर करण्याचे निर्देश एमएमआरडीएला दिले होते.

> मुख्यमंत्र्यांनी दिलेल्या निर्देशानुसार एमएमआरडीएने व्यवहार्यता अहवाल सादर केला असल्यास त्याची माहिती ग्रामस्थांना मिळणे आवश्यक ठरते. अहवालात गौडबंगाल असल्यानेच कारशेडला विरोध करणाऱ्या ग्रामस्थांना अंधारात ठेवण्याचा प्रयत्न केला जात आहे. ग्रामस्थांचा विरोध डावलून मेट्रो गावातच प्रस्तावित केल्यास ग्रामस्थ रस्त्यावर उतरून तीव्र जनआंदोलन छेडतील. तत्पूर्वी ग्रामस्थ भूमिपुत्र सामाजिक समन्वय समितीच्या माध्यमातून एमएमआरडीए व राज्य शासनाला पत्रव्यवहार करणार आहे.
>
> **- अशोक पाटील,**
> अध्यक्ष (भूमिपुत्र सामाजिक समन्वय समिती)

Scanned with CamScanner

पुढारी पा-नं.२.

# मदरसे, लव्ह जिहादवरून नितेश राणे-आझमींमध्ये बाचाबाची

**मुंबई : पुढारी वृत्तसेवा**

भाजप आमदार नितेश राणे आणि समाजवादी पक्षाचे आमदार अबू आझमी यांच्यात अनधिकृत मदरसे आणि लव्ह जिहादच्या मुद्द्यावरून शाब्दिक बाचाबाची झाली. त्यामुळे मंगळवारी विधिमंडळ परिसरात काही काळ वातावरण तापले होते.

राणे यांनी अनधिकृतपणे मदरसे उभारले जात असल्याचा मुद्दा अबू आझमी यांच्याकडे उपस्थित केला. ग्रीन झोनमध्ये मदरसे उभारले जात आहेत, अशी तक्रार राणेंनी आझमी यांच्याकडे केली. यावर अबू आझमी म्हणाले की, कोणत्याही धर्माचे असले तरी अनधिकृत बांधकाम पाडलेच पाहिजे. त्यावर राणे यांनी कारवाई करायला गेले की, हत्यारे काढली जातात, असे सांगत तुम्ही माझ्यासोबत चला तुम्हाला दाखवतो, काय सुरू आहे ते, असे आव्हान आझमींना दिले; पण आझमी यांनी हे सर्व खोटे आहे, हे दाखवायला मी कधीही तुमच्यासोबत येऊ शकतो, असे राणेंना सुनावले.

यानंतर नितेश राणे यांनी लव्ह जिहादचा मुद्दा उपस्थित केला. ते म्हणाले की, तुम्हाला लव्ह जिहाद आहे हे मान्य करावे लागले. तुम्ही तारीख आणि वेळ सांगा तुम्हाला लव्ह जिहाद आहे, हे दाखवायला घेऊन जातो. यावर आझमी म्हणाले की, मी तुम्हाला हे खोटे आहे हे सांगण्यासाठी ५० ठिकाणी घेऊन जातो. त्यानंतरही ही शाब्दिक चकमक सुरूच राहिली.

तुम्ही प्रेमाची भाषा करता; पण इतरांनाही ते शिकवा, असा टोला नितेश राणे यांनी आझमींना लगावला. त्यानंतर आझमी निघून गेले. जाताना हे असे होऊ शकत नाही. लव्ह जिहाद अशक्य आहे, असे ते म्हणाले.



**मुंबई : आ. नितेश राणे आणि अबू आझमी यांच्यात विधिमंडळाच्या आवारात बाचाबाची झाली.**

**● नितेश राणे यांनी प्रसिद्धीमाध्यमांशी बोलताना अबू आझमी यांच्यावर टीका केली. यांना सत्य स्वीकारायचे नाही. पत्रकार परिषद घेऊन त्यांनी हे खोटे आहे, हे सांगावे. यांच्यात सत्य ऐकण्याची ताकद नाही. यांच्यामुळे मुलींचे आयुष्य खराब होत असेल तर बरोबर नाही. ज्या मुलींचे आयुष्य खराब झाले आहे, त्यांचे जरा ऐका. मी खरे बोलतोय हे त्यांना खटकले. आज ना उद्या यांचे खरे चेहरे उघड होणार आहेत, असे राणे म्हणाले.**

पुढारी ५-पा-४.

# भांडण सोडवायला गेलेल्या इसमास मारहाण

**मिरारोड : पुढारी वृत्तसेवा**

मिरा रोड कनाकीया येथे राहणारे ऍंथनी डीगो कार्डोझो हे मध्यरात्री रिक्षाने घरी जात असताना रस्त्यामध्ये काही इसम एका इसमास मारत होते. ते भांडण सोडवण्यासाठी गेलेल्या ऍंथनी यांना जबर मारहाण केल्याची घटना घडली आहे. त्या अनोळखी इसमाविरोधात गुन्हा दाखल करण्यात आला आहे. ऍंथनी डीगो कार्डोझो हे त्यांचा मित्र श्याम तिवारी रिक्षाने कनाकिया येथे जात असताना सेवन स्केअर ऍकॅडमी जवळ तीन-चार व्यक्ती एका इसमास मारत असल्याचे दिसले. त्यावेळी ऍंथनी यांनी रिक्षा थांबवून १०० नंबर डायल करून त्या ठिकाणी तीन-चार इसम एका व्यक्तीस मारहाण करत असल्याबाबत सांगून पोलिस मदत मागितली. त्यावेळी त्यातील दोन इसम हे रिक्षाजवळ येऊन तु कोणाला फोन करत आहे असे बोलून शिविगाळ करण्यास सुरुवात केली. त्यावेळी तुम्ही त्या मुलाला का मारत आहात असे बोललो असता ते इसम तेथून निघून गेले व पुन्हा लगेच अजून सहा-सात इसमाना घेऊन आले. त्यांनी ऍंथनी याला जबर मारहाण करून गंभीर जखमी केले. या प्रकाराबाबत नवघर पोलिस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

Scanned with CamScanner

पुढारी पु. पा. ३.

# घोडबंदर-खानिवडेदरम्यान बेकायदेशीर माती भराव

## पर्यावरण संरक्षण अधिनियमाअंतर्गत तिघांविरोधात वालीवमध्ये गुन्हा दाखल

**वसई : पुढारी वृत्तसेवा**

वसईचे प्रांत अधिकारी स्वप्नील तांगडे यांच्या आदेशान्वये मंडळाधिकारी कुमार पृथ्वीराज होगाडे यांनी ससूनवघर येथील खारजमिनीत मातीचा भराव करून कांदळवनाचे नुकसान करणे व नैसर्गिक नाला बुजवून पर्यावरणाला हानी पोचविणाऱ्या तत्कालीन जमीन मालक नरेश रियावाला, भगवती एस जैन, जयंत देवराज कोठारी यांच्याविरुद्ध पर्यावरण संरक्षण अधिनियम १९८६ चे कलम १५ व १९ अंतर्गत गुन्हा दाखल करण्यात आला आहे. वालीव पोलीस स्टेशन अंतर्गत गुन्ह्याचा तपास सुरू आहे.



यापूर्वी सुद्धा वालीव पोलीस स्टेशनमध्येच पर्यावरणाची हानी करणे व पर्यावरणाचे नुकसान करणे प्रकरणी देखील गुन्हा दाखल झाला आहे. त्यामुळे घोडबंदर ते खानिवडे दरम्यान मोठ्या प्रमाणात मातीभराव करून नैसर्गिक नाले बुजवले जातात व पर्यावरणाचे नैसर्गिकरित्या संरक्षण करणाऱ्या कांदळवनाचा ऱ्हास केला जात आहे, हे पुन्हा एकदा सिद्ध झाले.

मुंबई -अहमदाबाद महामार्ग नजीक असणाऱ्या ससूनवघर गावातील स्थानिक रहिवासी अनंत कृष्णा पाटील ,ऋषिकेश गंगाधर पाटील, गंगाधर लाडक्या म्हसे,प्रकाश मदन सांबरे यांनी उपविभागीय अधिकारी, वसई यांच्याकडे दि.१४ ऑक्टोबर २०२१ रोजी तक्रार केली होती. ससूनवघर येथील सर्वे क्रमांक ३२५ जुना व नवीन १७५ येथे जमीनीचे तत्कालीन मालक नरेश रियावाला, भगवती जैन , देवराज कोठारे यांनी खारभूमीमध्ये मोठ्या प्रमाणात दगड माती, डेब्रिज यांचा भराव केला होता. यामुळे ही कारवाई करण्यात आली आहे.

सकाळ पा. नं. ५.

# नालासोपाऱ्यात चारित्र्याच्या संशयावरून पत्नीची हत्या

नालासोपारा, ता. १४ (बातमीदार) : चारित्र्याच्या संशयावरून पतीने पत्नीची गळा दाबून हत्या केल्याची घटना नालासोपाऱ्यात उघडकीस आला आहे. हत्येनंतर आरोपी पती स्वतः पोलिस ठाण्यात हजर झाला आहे. याबाबत तुळिंज पोलिस ठाण्यात हत्येचा गुन्हा दाखल करून आरोपी पतीला पोलिसांनी बेड्या ठोकल्या आहेत.

प्रभूनाथ विश्वकर्मा असे आरोपी पतीचे नाव आहे, तर अनिता विश्वकर्मा असे हत्या झालेल्या पत्नीचे नाव आहे. नालासोपारा पूर्व वालाईपाडा या परिसरात हे दाम्पत्य राहत होते. त्यांना दोन आणि तीन वर्षांचे दोन मुले आहेत. आरोपी प्रभूनाथ विश्वकर्मा हा एका खासगी कंपनीत काम करीत होता, तर पत्नी अनिता विश्वकर्मा गृहिणी होती. अनिता चारित्र्याच्या संशयावरून प्रभूनाथ व अनिता या दोघात नेहमी वादविवाद होत होता. सोमवार (ता. १३) नेहमीप्रमाणे या दोघांत वाद झाला असता राहत्या घरातच पतीने पत्नीची टॉवेलने गळा आवळून हत्या केली. हत्येनंतर दोन मुले आणि पत्नीचा मृतदेह घरातच ठेवून आरोपीने तुळिंज पोलिस चौकीत हजर होत हत्येची कबुली दिली आहे. त्यानंतर पोलिसांनी मृतदेह ताब्यात घेऊन, आरोपीविरोधात हत्येचा गुन्हा दाखल करून त्याला अटक केले आहे. या प्रकरणाचा तुळिंज पोलिस अधिक तपास करत आहेत.

Scanned with CamScanner

सकाळ ५-पा-२.

# विरार-फुलपाड्यातील वाहतूक कोंडी सोडवा

## तोडगा काढण्याची शिवसेनेची मागणी

विरार, ता. १४ (बातमीदार) : विरार पूर्व परिसरातील कोपरी नाका, साईनाथ नगर, जीवदानी पायथा, पाच पायरी तसेच जीवदानी चौक (साईबाबा मंदिर) बाझार वॉर्ड परिसरात दररोज होणारी वाहतूककोंडी डोकेदुखी ठरली आहे. या मागणीकरिता माजी स्थायी समिती सभापती तथा शिवसेना (बाळासाहेब ठाकरे) तालुकाप्रमुख सुदेश चौधरी यांनी नुकतीच पालिका आयुक्त अनिलकुमार पवार यांची भेट घेतली.

वाहतूक कोंडीमुळे नागरिक व विद्यार्थी हैराण होत असल्याने या कोंडीवर कायमस्वरूपी तोडगा काढण्यात यावा, या मागणीने जोर धरला आहे. या भेटीत विरार-फुलपाडा व अन्य ठिकाणच्या समस्या चौधरी यांनी आयुक्तांच्या निदर्शनास आणून दिल्या आहेत. मागील काही वर्षांत विरार पूर्व भागात वाहतूककोंडीची समस्या मोठ्या प्रमाणात वाढलेली आहे. त्यामुळे विद्यार्थी, ज्येष्ठ नागरिक तसेच नोकरदार, व्यावसायिकांना निश्चित वेळात कामावर पोहचता येत नाही. विरार पश्चिम येथील मधुबन हॉटेल ते बंजारा हॉटेलपर्यंत दुभाजक टाकण्यात यावेत. मलांज मैदानात दररोज मोठा बाजार भरत असल्याने या बाजारात येणारे नागरिक दुचाकी व चारचाकी वाहने रस्त्यावरच उभी करत असल्याने या परिसरात रहदारीला अडथळा येतो. त्यामुळे या ठिकाणी दुभाजक बनवल्यास या परिसरातील वाहतूक कोंडीची समस्या कमी होईल. तसेच रस्त्यात उभ्या करून ठेवण्यात येणाऱ्या वाहनांमुळे असलेली अपघातांची शक्यताही कमी होईल. त्यामुळे बांधकाम विभागाला या रस्त्यावर पाहणी करून दुभाजक उभारण्याच्या सूचना कराव्यात, अशी मागणीही सुदेश चौधरी यांनी केली आहे. रस्त्यांवर भरत असलेले बाजार, अनधिकृत फेरीवाले तसेच अनेक ठिकाणी रस्त्यावर असलेले अडथळे दूर करणे गरजेचे असल्याचे मत चौधरी यांनी व्यक्त केले आहे.

लोकमत पा-नं २.

# लग्नास नकार, तरुणीची आत्महत्या

लोकमत न्यूज नेटवर्क

मीरा रोड : लग्नाचे प्रलोभन दाखवून गरोदर ठेवले. त्यानंतर गर्भपात करायला लावल्यानंतर मात्र लग्नास नकार देत मारहाण केल्याने १९ वर्षीय तरुणीने राहत्या घरात पंख्याला गळफास घेऊन आत्महत्या केली. भाईंदर पोलिसांनी तरुणीने आत्महत्येपूर्वी लिहिलेल्या चिठ्ठीच्या आधारे गुन्हा दाखल करून प्रियकराला अटक केली आहे.

ओम शिव इमारतीत राहणाऱ्या सदफ खान (वय १९) हिचे नेहरू नगर झोपडपट्टीत राहणाऱ्या मोहम्मद जावेद शेख याच्याशी (वय २२) वर्षभरापासून प्रेमसंबंध होते.

११ मार्चला सायंकाळी जावेदने तिला क्रॉस गार्डन भागात मारहाणसुद्धा केली होती.आत्महत्या करण्यापूर्वी तिने चिठ्ठी लिहिली होती. त्यात जावेदने लग्न करतो, असे सांगून माझी अब्रू घेतली. त्यानंतर बळजबरी गर्भपात करायला लावला. त्याने लग्नास नकार दिल्याने माझ्यासमोर दुसरा मार्गच ठेवला नाही. मी जे करेन, त्यास जावेद जबाबदार असल्याचे तिने चिठ्ठीत लिहीले. मोठी बहीण आर्शिया हिच्या फिर्यादीवरून पोलिसांनी जावेदला अटक केली आहे.

Scanned with CamScanner

लोकमत पा.नं. २

# बनावट सह्या करून सातबाऱ्यावर फेरफार

## तलाठ्यासह अन्य दोघांवर गुन्हा दाखल

लोकमत न्यूज नेटवर्क

मीरा रोड : भाईंदरच्या मुर्धा येथील जमिनीच्या सातबाऱ्यात फेरफार करून ती विकल्याप्रकरणी तत्कालीन तलाठी व्ही. बी. पवार व विकासक श्यामसुंदर व राधेश्याम अग्रवाल यांच्यावर गुन्हा दाखल केला आहे. विकासक भावांवर भाईंदर पोलिसांत गुन्हा दाखल आहे.

नयना पाटील यांच्या फिर्यादीनुसार, त्यांच्या कुटुंबीयांनी त्यांची भाईंदरची जमीन १९९४ मध्ये नरेश जैन व शैलेश शाह यांना विकास करारनामा कुलमुखत्यार पत्राद्वारे दिली होती. दोघांनी २० टक्केच रक्कम दिल्याने २०११ मध्ये जैन व शाह यांच्यासोबतचा हा व्यवहार नोटिसीद्वारे रद्द केला होता. मात्र, २०२२ मध्ये सातबाऱ्यात श्यामसुंदर व राधेश्याम अग्रवाल यांची नावे दिसली. त्यांच्या जमिनीसंबंधी २००८ व २०१० मधील तीन नोंदणीकृत करारनामे आढळले. दोन करारनामे हे जैन व शाह यांनी पाटील कुटुंबीयांचे कुळमुखत्यार म्हणून काही जमीन दिनेश व मोरारजी छेडा व त्यांनी श्यामसुंदर व राधेश्याम यांना विक्री केल्याचे होते. तर तिसरा करारनामा हा जैन व शाह तसेच छेडा यांच्यातर्फे रमेश जैन, पी. क्रिस्तोफर व मीरा-भाईंदर महापालिका यांच्यातील असल्याचे आढळले.

लोकमत ५-५-१.

# साडेदहा लाखांचा तरुणाला गंडा

लोकमत न्यूज नेटवर्क

मीरा रोड : मीरा रोडमधील एका बारच्या वेटरला ऑनलाइन गेम ॲपद्वारे ओळख झालेल्या अनोळखी महिलेने लग्नाच्या भूलथापा देत शिक्षणासाठी पैसे पाहिजेत सांगून तब्बल १० लाख ५५ हजार रुपयांना फसवल्याप्रकरणी नवघर पोलिसांनी गुन्हा दाखल केला आहे.

ज्युपिटर इमारतीत राहणारा प्रसाद शेट्टी (२४) हा मौसम बारमध्ये वेटरचे काम करतो. ऑगस्ट २०२२ मध्ये फॉर फन लाइट ग्रुप चॅट ल्युडो या गेमिंग ॲपमध्ये तुषार सर्वी नावाची आयडी असलेल्या अनोळखी व्यक्तीसोबत गेम खेळत होता. समोरच्या व्यक्तीने शेट्टीला मॅसेज करून दिल्लीत एमबीबीएसचे शिक्षण घेत असून, चांगल्या बॉयफ्रेंडची गरज असल्याचे मोबाइल क्रमांकासह कळवले. शेट्टी याने खात्री करण्यासाठी त्यावर कॉल केला असता त्यावरून महिला बोलत होती. तिने महिमा शर्मा असे नाव सांगितले. त्यांच्यात चॅटिंग सुरू होते.

लोकमत ५-५-१.

# जुन्या पेन्शनसाठी ६८ हजार कर्मचारी संपावर

## विविध विभागांचे कामकाज ९० टक्के ठप्प; आंदोलनाद्वारे वेधले प्रशासनाचे लक्ष

लोकमत न्यूज नेटवर्क

ठाणे : जुन्या पेन्शनसाठी येथील जिल्हाधिकारी कार्यालयासह जिल्हा परिषदेमधील सरकारी-निमसरकारी कर्मचारी, शिक्षक-शिक्षकेतर, पालिका, नगरपालिका, नगरपरिषदा, पंचायत कर्मचारी व कंत्राटी कर्मचारी आदी विभागांचे तब्बल ६८ हजार कर्मचारी मंगळवारी बेमुदत संपावर गेले आहेत. त्यामुळे या कार्यालयांच्या विविध विभागांचे कामकाज ९० टक्के ठप्प झाल्याचे निदर्शनात आले आहे.




ठाणे जिल्हाधिकारी कार्यालयाच्या आवारात राज्य सरकारच्या सर्व विभागातील कर्मचाऱ्यांनी एकत्र येत जोरदार निदर्शने केली. (छाया : विशाल हळदे)

राज्यस्तरीय बेमुदत संपादरम्यान आज सकाळी कार्यालयीन वेळेत विविध संघटनांचे कर्मचारी ठाणे जिल्हाधिकारी कार्यालयाच्या प्रांगणात एकत्र आले. त्यांनी शासकीय विश्रामगृहासमोर दोन तास आंदोलन करून प्रशासनाचे लक्ष वेधले. ठाणे जिल्हा शाखेचे राज्य सरकारी कर्मचारी मध्यवर्ती संघटनेचे सरचिटणीस भास्कर गव्हाळे, प्राची चाचड, प्रदीप मोरे, जुनी पेन्शन संघटनेचे अध्यक्ष विनोद लुटे, नोंदणी व मुद्रांक विभागाचे प्रवीण गिरी, संतोष देवडे, जिल्हा परिषद सेवानिवृत्त कर्मचाऱ्यांचे पदाधिकारी, रामचंद्र मडके, राजेंद्र जगे, मेंटल हॉस्पिटल कर्मचारी संघटनेचे रमेश पाटील आदींनी या कर्मचाऱ्यांचे नेतृत्व केले. जुनी पेन्शन पदरात पाडून घेण्यासह प्रलंबित सर्व मागण्या मंजूर केल्याशिवाय हा राज्यस्तरीय बेमुदत संप मागे घेणार नसल्याचा निर्धार करून कर्मचाऱ्यांनी आंदोलन छेडले. या संपाला महाराष्ट्र कामगार संघटना संयुक्त कृती समिती, अंगणवाडी कर्मचारी, सेविका, आशा वर्कर्स आदी संघटनांनी पाठिंबा दिला आहे.

Scanned with CamScanner

लोकसत्ता फु-पा. १.



सरकारी, निमसरकारी कर्मचाऱ्यांच्या राज्यव्यापी संपात पालघर जिल्ह्यातील कर्मचाऱ्यांनी उत्स्फूर्त सहभाग घेतला. जिल्हाधिकारी कार्यालयावर कर्मचाऱ्यांनी मोर्चा काढला होता.

# वसईतील दैनंदिन कामकाजांवर परिणाम

## सरकारी कार्यालयांत शुकशुकाट

**लोकसत्ता वार्ताहर**

**वसई :** राष्ट्रीय पेन्शन स्कीम (एनपीएस) रद्द करून जुनी पेन्शन योजना (ओपीएस) लागू करावी, अशी मागणी करीत मंगळवारी वसईतील विविध विभागातील मोठ्या संख्येने शासकीय कर्मचारी या संपात सहभागी झाले होते याचा परिणाम दैनंदिन कामकाजावर झाला असल्याचे चित्र दिसून आले.

प्रामुख्याने जुनी पेन्शन योजना लागू करणे व मा बक्षी समितीने खंड २ च्या माध्यमातून जिल्हा परिषद कर्मचारी यांच्या वेतन त्रुटी दूर केल्या नाहीत याबाबत फेर विचार करणे यासह इतर मागण्यासाठी वसई तालुक्यातील शासकीय कर्मचाऱ्यांनी संप पुकारला आहे. त्यामुळे शासकीय कार्यालयातील कामकाज ठप्प झाले आहे. शाळा आणि आरोग्य यंत्रणेवरही संपाचा परिणाम झाला आहे.

वसईतील पंचायत समिती, तहसिल दार विभाग कर्मचारी, शिक्षण अशा विभागातील कर्मचारी यात सहभागी झाले होते. शासनाने मागण्या मान्य कराव्यात या मागणी साठी वसई तहसिलदार कार्यालय, पंचायत समिती कार्यालय अशा ठिकाणी एकत्रित येत निदर्शने करण्यात आली. ' एकच मिशन, जुनी पेन्शन अशी घोषणा बाजी केली.

गेल्या अनेक वर्षांपासून आम्ही कर्मचारी या सेवेत कार्यरत आहोत. शासनाने आमच्या मागणीचा विचार करावा.

केवळ आश्वासन नको तर निर्णय घ्यावा अशी मागणी संपात सहभागी झालेल्या कर्मचाऱ्यांनी केली आहे.

मोठ्या संख्येने कर्मचारी यात सहभागी झाले असल्याने सर्वच ठिकाणच्या शासकीय कार्यालयात शुकशुकाट पहायला मिळाला.

कामकाज ठप्प झाले असून कर्मचारी संघटना आक्रमक झाल्याचे चित्र दिसून आले. तर कामासाठी आलेल्या नागरिकांना ही संपामुळे रिकाम्या हाताने माघारी परतावे लागले.

Scanned with CamScanner

पोलीस ठाण्याचे शुक्रवारी उद्घाटन; पोलीस महासंचालक उपस्थित राहणार

# नायगावमधील गुन्हेगारीला बसणार चाप

भाईंदर, (वा.) मीरा-भाईंदर, वसई-विरार पोलीस आयुक्तालयाच्या स्थापनेनंतर आयुक्तालयांतर्गत पेल्हार, मांडवी, आचोळे पोलीस ठाणे नव्याने बनवण्यात आली आहेत. आता अनेक वर्षांच्या प्रतिक्षेनंतर आयुक्तालयाच्या हद्दीत नव्याने नायगाव पोलीस स्टेशन लवकरच मार्गी लागत आहे. या पोलीस ठाण्याचे काम आता पुर्ण झाले असून येत्या शुक्रवारी सकाळी ११ वाजता राज्याचे पोलीस महासंचालक रजनीश सेठ यांच्या हस्ते नायगाव पोलीस ठाण्याचे उद्घाटन करण्यात येणार आहे.

नव्याने सुरू होणाऱ्या नायगाव पोलीस ठाण्याचे नवे-पहिले पोलीस निरीक्षक रमेश भामे आणि सहाय्यक पोलीस निरीक्षक बळीराम पालकर यांच्या अथक परिश्रमातून पोलीस ठाणे कमी वेळात उभे करण्यास मदत झाली आहे. ठाणे नायगावकरांच्या सेवेसाठी सज्ज होत आहे. पोलीस ठाण्यात अधिकारी कक्ष, अंमलदार कक्ष आणि इतर कक्षांचे काम पूर्ण झाले आहे. वालीव पोलीस ठाण्याचे विभाजन करून हे पोलीस ठाणे निर्माण करण्यात आले आहे.



## नायगाव पूर्व विभागासाठी सेवा बजावणार

वालीव पोलीस ठाण्याच्या हद्दीचा मोठा परिसर आणि वाढती गुन्हेगारी लक्षात घेता सदर नवीन नायगाव पोलीस ठाणे हे नायगाव पूर्व विभागासाठी सेवा बजावणार आहे. या पोलीस ठाण्याच्या सुरुवातीमुळे नायगाव शहरातील त्याचप्रमाणे हायवे पट्ट्यातील गुन्हेगारी, लूटमार याला नक्कीच आळा बसणार आहे. नव्याने सुरू करण्यात येणाऱ्या पोलीस ठाण्याच्या सुरुवातीला काम करताना अनेक अडचणी येणार आहेत.

Scanned with CamScanner

1997 से

KAT खबरें आज तक

not a publication of the living media india group

वर्ष: 26 अंक-269 मुंबई, बुधवार 15 मार्च 2023 पृष्ठ-12 मूल्य :2.00

# शुक्रवार को बहुचर्चित नायगांव थाने का उद्घाटन

वसई : बहुचर्चित नायगांव पुलिस स्टेशन का काम पूरा हो चुका है और शुक्रवार 17 मार्च को इसका उद्घाटन होगा, नायगांव, वसई विरार शहर का 11वां पुलिस थाना और मीरा भाईदर पुलिस आयुक्तालय का 17वां पुलिस थाना है। ज्ञात हो कि, मीरा भायंदर वसई विरार पुलिस आयुक्तालय की स्थापना 1 अक्टूबर, 2020 को हुई थी।यह नया पुलिस स्टेशन पालघर और ठाणे ग्रामीण पुलिस अधीक्षक के कार्यालयों को विभाजित करके बनाया गया था।नए ढांचे में शहर में तीन सर्किल बनाए गए हैं, सर्कल 1 मीरा भायंदर शहर में बनाया गया था और


KAT खबरें आज तक

नायगांव पुलिस स्टेशन के उद्घाटन का इंतजार

2 सर्कल वसई विरार शहर में बनाए गए थे।उस समय वसई विरार शहर में मांडवी, पेल्हार, बोलिंज, आचोले और नायगांव थाने प्रस्तावित थे।बोलिंज और नायगांव थाने बनाए जाने थे, जगह की कमी के कारण बोलिंज थाने का काम बंद है।

नायगांव में किराए के मकान में थाना बना दिया गया है।वालीव और मानिकपुर थानों को विभाजित कर नायगांव थाना बनाया गया है।वरिष्ठ पुलिस निरीक्षक रमेश भामे को थाना प्रभारी नियुक्त किया गया है, नायगांव पुलिस थाने का उद्घाटन शुक्रवार 17 मार्च को सुबह 11 बजे पुलिस महानिदेशक रजनीश सेठ करेंगे।

Scanned with CamScanner

लोकमत




नायगाव पोलिस ठाणे बनवून रंगरंगोटी करून बऱ्याच दिवसांपासून उद्घाटनाच्या प्रतीक्षेत होते. त्याचा अखेर मुहूर्त सापडला आहे.

# नायगाव पोलिस ठाण्याचे १७ मार्चला उद्‌घाटन

## खासदार, आमदार, महासंचालक येणार

लोकमत न्यूज नेटवर्क

**नालासोपारा** : वालीव पोलिस ठाण्याच्या हद्दीत वाढती गुन्हेगारी रोखण्यासाठी पोलिस आयुक्तालय सुरू झाल्यापासून नायगाव पोलिस ठाणे निर्मिती करण्यासाठी हालचाली सुरू करण्यात आल्या होत्या. जूचंद्रच्या वामन ढाब्याजवळील साई इनक्लेव्ह या इमारतीतील आठ गाळे भाडे तत्त्वावर घेऊन नायगाव पोलिस ठाणे बांधण्यात आले आहे. अखेर १७ मार्चला या पोलिस ठाण्याच्या उद्घाटनाचा मुहूर्त ठरला असून, पोलिस महासंचालक रजनीश शेठ यांच्या हस्ते उद्घाटन होणार आहे.

यावेळी खासदार राजेंद्र गावित, आमदार क्षितिज ठाकूर, पोलिस आयुक्त मधुकर पांडेय, अप्पर पोलिस आयुक्त श्रीकांत पाठक, तिन्ही झोनचे पोलिस उपायुक्त, साहाय्यक आयुक्त, प्रभारी पोलिस निरीक्षक आणि अधिकारी व पोलिस कर्मचारी वर्ग उपस्थित राहणार आहे. वाढती गुन्हेगारी रोखण्यासाठी मीरा-भाईंदर वसई-विरार पोलिस आयुक्तालय १ ऑक्टोबर २०२० रोजी सुरू झाले. त्यावेळी वसईतील मांडवी, बोळींज, पेल्हार, आचोळे आणि नायगाव हे पाच पोलिस ठाणे नव्याने सुरू करणार असल्याचे सांगण्यात आले होते.

वालीव पोलिस ठाण्यातील गुन्हेगारीचा ग्राफ आणि पोलिसांवरील ताण कमी करण्यासाठी नायगाव पोलिस ठाणे लवकर सुरू करण्यासाठी पावले उचलत सर्व परवानग्या घेऊन पोलिस ठाण्याची निर्मिती करण्यात आली. नायगाव पोलिस ठाण्याचे वरिष्ठ पोलिस निरीक्षक म्हणून रमेश भामे पदभार सांभाळणार आहेत. तर त्यांच्या नेतृत्वाखाली पोलिस निरीक्षक, साहाय्यक पोलिस निरीक्षक आणि पोलिस उपनिरीक्षक असे १३ पोलिस अधिकारी, ४३ पोलिस अंमलदार कार्यरत असणार आहेत.



Scanned with CamScanner

लोकमत

# स्पीड लॉक बंधनकारक; नसेल तर वाहनांचे पासिंग लटकणार

मंगेश कराळे
लोकमत न्यूज नेटवर्क

**नालासोपारा :** रस्ते अपघातांचे प्रमाण कमी व्हावे यासाठी सरकारने सर्व प्रवासी वाहनांना स्पीड लॉक बसवणे अनिवार्य केले आहे. रस्ते अपघातांना आळा घालण्यासाठी 'स्पीड लॉक' अर्थात स्पीड गव्हर्नर बसविण्याचा निर्णय काही वर्षांपूर्वी घेण्यात आला. त्याची अंमलबजावणी १ मार्चपासून सुरू झाली आहे. स्पीड गव्हर्नर बंधनकारक असतानाही अनेकांनी ते बसवलेले नसल्यास अशा वाहनांची पासिंग केली जाणार नाही, असे आरटीओने सांगितले आहे.

२०१८ नंतरच्या सर्व वाहनांना स्पीड लॉक बसवणे बंधनकारक केले आहे. परवान्याशिवाय प्रवासी वाहतूक केल्यास किंवा आसनक्षमतेपेक्षा जास्त प्रवाशांची वाहतूक केल्यास पाच हजारांपर्यंत दंड होऊ शकतो. स्पीड लॉक न बसविणे व छेडछाड केल्यास संबंधितांवर कारवाई करणार असल्याचे आरटीओने सांगितले आहे.




## १ मार्चपासून अंमलबजावणी

१ मार्चपासून स्पीड गव्हर्नर बसवणे परिवहन विभागाने बंधनकारक केले आहे. २०१८ नंतरच्या सर्व वाहनांना स्पीड लॉक बसवणे बंधनकारक आहे.

## अनेक वाहनाचे पासिंग शिल्लक

अवजड वाहनासह प्रवासी वाहनात स्पीड लॉक नसल्याने अनेक वाहनांची पासिंग शिल्लक आहे. अशी माहिती उपप्रादेशिक परिवहन विभागाने दिली आहे.

## आरटीओने काही वाहने पाठविली परत

ट्रक, टुरिस्ट बस, ट्रेलर, डंपर, अशा वाहनांना १ मार्चपासून स्पीड लॉक बसविणे बंधनकारक आहे. अनेक वाहनामध्ये स्पीड गव्हर्नर बसविले नसल्याने काही वाहने विनापासिंग परत पाठविली जात आहेत.

## वाहतूक नियमांचे पालन आवश्यक

वेगावर नियंत्रण नसल्यास अपघात होण्याची शक्यता असते, त्यामुळे वाहन चालवताना वाहतूक नियमांचे पालन करणे अत्यंत गरजेचे आहे. प्रवासी वाहनात स्पीड लॉक लावणे आवश्यक आहे.

> वाहन पासिंगसाठी आरटीओ कार्यालयात आल्यानंतर त्याचा डेटा सिस्टीमवर दिसणे आवश्यक आहे. जर स्पीड लॉक दिसले तर वाहनाची पासिंग होणार. आता सर्व मालवाहू आणि प्रवासी वाहनांना ते सक्तीचे केले आहे.
> — प्रवीण बागडे, सहायक प्रादेशिक परिवहन अधिकारी, विरार



Scanned with CamScanner